# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिप्रेक्ष्यातून पंढरीचा पांडुरंग : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. धनंजय होनमाने**

---

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे घराणे हे कबीर पंथीय होते . त्यांच्या वडिलांनी संत कबीर यांना आध्यात्मिक गुरू मानले होते. मुळातच धार्मिक वृत्तीच्या रामजी बाबांनी रामायण , महाभारत , आदि ग्रंथांबरोबरच संत ज्ञानेश्वर, संत नामदेव,संत जनाबाई ,संत एकनाथ, संत तुकाराम, मुक्तेश्वर, व श्रीधर स्वामी यांचे ग्रंथ घरामध्ये ठेवलेले होते. या ग्रंथांचे दररोज वाचन केल्याशिवाय जेवण दिले जात नव्हते . एवढा सक्तीचा आग्रह वडिलांचा असल्यामुळे बालपणाच डॉ.बाबासाहेबांनी या ग्रंथांचे वाचन केलेले होते .

पंढरीचा श्री विठ्ठल हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होय .भिवरेच्या तिरी गेली अठ्ठावीस युगे भक्त पुंडलिक यांनी दिलेल्या विटेवर कटीवर कर ठेऊन उभा असणारा श्री विठ्ठल महाराष्ट्रातील संतांचे विश्रांती स्थान बनला . संपूर्ण भारतभर असणाऱ्या विविध देव - देवतांच्या मंदिरांमध्ये मंदिरातील देव आपल्या हातात कोणती ना कोणती तरी शस्त्रे घेऊन उभे किंवा बसलेले आपणास दिसतात . फक्त पंढरपूरचा श्री विठ्ठल या सर्वाला अपवाद आहे . भक्त पुंडलिक यांनी भिरकावलेल्या विटेवर कटीवर ठेऊन स्थिर उभा राहणारा श्री विठ्ठल नेमका कोण ? हा प्रश्न प्रज्ञावंत असणाऱ्या डॉ.बाबासाहेब यांना पडणे अगदी स्वाभाविक आहे. याच प्रश्नांचा शोध त्यांनी एकवेळ घेण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच ' पांडुरंग कोण आहे ' हा लेख त्यांनी लिहिला . तसं तर त्यांना विस्तृत स्वरूपात या संदर्भात ग्रंथ लेखन करावयाचे होते . पण काही कारणास्तव अतिशय मोजक्या स्वरूपात त्यांनी याविषयी भाष्य केले आहे. त्याच लेखावर एका तटस्थपणे व साक्षेपी वृत्तीने दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

* पांडुरंग कोण आहे? लेखाची पार्श्वभूमी –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी हे सैन्यात नोकरी करत होते. मुळात धार्मिक वृत्तीच्या रामजी बाबांनी संत कबीरांना आध्यात्मिक गुरू मानले होते. घरातील वातावरण धार्मिक स्वरुपाचे ठेवण्यासाठी त्यांनी सैनिकी शिस्त घालून दिलेली होती . यासंदर्भात स्वतः डॉ.बाबासाहेब म्हणतात. ' आपल्या मुलांना कडक शिस्तीत वाढवणार्या एखाद्या रोमन कुटुंब प्रमुखाच्या पद्धतीप्रमाणे माझ्या वडिलांच्या हाताखाली मी प्रशिक्षण घेत होतो . माझ्या वडिलांचे एक स्नेही मराठी भाषेतील सुप्रसिद्ध विद्वान श्री.दादा केळुसकर यांनी, मी शाळेच्या कोणत्या तरी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याकाळी एखाद्या अस्पृश्य जातीच्या मुलाने असे यश मिळवणे हे कौतुकाचे मानले जाई - म्हणजे त्यांनी मराठीत लिहिलेल्या ' बुद्धाचे जीवन ' या पुस्तकाची एक प्रत मला दिली . मी ते पुस्तक वाचून काढले आणि त्याचवेळी एका पूर्ण पणे वेगळ्याच जगात असल्याचा मला प्रत्यय आला . माझ्या वडिलांनी, जे आपल्या मुलांना धार्मिक शिक्षण देण्याबाबत आग्रही होते त्यांनी बौध्द धर्माबाबत मी काही वाचण्याबाबत मला का सांगितले नाही असा प्रश्न मला पडला.माझ्या वडिलांची रेजिमेंट बर्मामध्ये होती , आणि बर्मामधिल लोक बौद्ध होते, हे त्यांना ठाऊक होते . ' त्रिशरणांचा 'पुनरुच्चार करण्यापलीकडे त्यांनी बौध्द धर्माबाबत फारसे स्वारस्य दाखवले नाही. कारण त्यांनी कबीर यांना अगोदरच आध्यात्मिक गुरू म्हणून स्वीकारले होते म्हणून अशी शक्यता वाटते . " १

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नंतर च्या आयुष्यात धार्मिक जीवनाविषयी चा संपर्क थोडाफार कमी झाला . शिक्षणासाठी स्वताला पूर्णांशाने वाहून घेतलेल्या डॉ.बाबासाहेबांनी बालपणातील घरातील धार्मिक वातावरण व त्या वातावरणाचा विचार केला नाही . किंवा तसा विचार करण्याची गरजही वाटली नाही. पण त्याच धार्मिक वातावरणात त्यांचे बालपण गेले होते . बालपणात जे काही जिज्ञासू मनात प्रश्न निर्माण झाले त्या प्रश्नांनी पुन्हा डोके वर काढले . महाराष्ट्रातील सर्व संत महात्मे ज्या पांडुरंगाचे गुणगान गातात तो पांडुरंग आहे तरी कोण ? प्रदीर्घ काळापासून त्यांना या प्रश्नाचे उत्तर सापडले नव्हते . त्याच प्रश्नांचा शोध घेण्यासाठी ते पंढरपूर ला निघाले होते. पण वाटेत लोणावळ्यातच प्रदीर्घ मुक्काम पडला . त्याच काळात त्यांनी आठ पानात जे चिंतन मांडले तो लेख म्हणजे पांडुरंग कोण आहे ? हा होय . ही आठ पाने म्हणजे या लिखाणाची प्रस्तावनाच आहे . मुख्य आशय सुरू व्हायचा होता . मात्र दुसऱ्या दिवसापासून बाबासाहेबांच्या बैठकीत सतत व्यत्यय येत राहिला .त्यांना निवांतपणा मिळेनासा झाला . मनातलं उतरणं झालं नाही.आणि हा विषय इथेच जो थांबला तो कायमचा .पण ही आठ पाने म्हणजे त्यांच्या चिकित्सक बुध्दीमतेची साक्ष देणारीच आहेत .त्याच लेखाचे थोडक्यात तटस्थपणे केलेले चिंतन प्रस्तुत शोधनिबंधात आहे.

* पांडुरंगाविषयी मतमतांतरे *

पंढरपूरच्या पांडुरंगाविषयी अनेक विचारवंतांनी आपापली मते मांडलेली आहेत . आपण फक्त डाॅ.बाबासाहेबांच्याच

मतांचा परामर्श घेणार आहोत . पंढरपूरचा पांडुरंग बुध्दरूप असल्याचा दावा बाबासाहेब ठामपणे करीत होते . त्या संदर्भात प्राचीन विद्वज्जनांचे , संतांचे दाखले त्यांना अभिप्रेत होते जा ॅन विल्सन च्या ' मेमोयर्स ऑन दी केव्ह टेम्पल ' या प्रसिद्ध ग्रंथातून विठ्ठल मंदिर भगवान बुध्दाच होतं . असं स्पष्ट करण्यात आले आहे. तर डॉ.के.जमनादास यांनीही वेगवेगळ्या वाङ्.मयीन व पुरातत्वीय पुराव्यांचा संदर्भ देऊन विठ्ठलाची मूळ मूर्ती ही बुध्द मूर्ती होय. असं प्रतिपादन केलं आहे. हे सिध्द करताना ते म्हणतात....

" पंढरपूर के देवता बुध्द ही है.और अन्य कुछ नहीं / ऐसी महाराष्ट्र में गहरी परम्परा पुरातन काल से चली आ रही है / और महाराष्ट्रीयन जनमानस में जम गई है / हमारे बचपन में , प्राथमिक पाठशाळा में मुलाक्षर और अंकोंको जो किताब होता था , उसमे दशावतारो के चित्र होते थे / नववा अवतार बुध्द दर्शया जाता था / और जो चित्र था वह अजिंठा व एलोरा आदिसे बुध्द या बोधीसत्व का न होकर पंढरपूरके विठ्ठल का होता था / विठोबा यह बुद्ध ही है , ऐसी गहरी मानसिकता महाराष्ट्रीयन जनमानस में बसी थी , यह बात इससे स्पष्ट होती है / " २

पंढरीच्या पांडुरंगाविषती ज्येष्ठ अभ्यासक डॉ.रा.चि.ढेरे यांनी विठ्ठलाच्या मूर्तीविषयी सखोल संशोधन केलेले आहे. पंढरीचा श्री विठ्ठल हा बुध्दच आहे असे अनेक संतांनी निर्वाळा दिला आहे याचा संदर्भ डॉ.ढेरे देतात . संत जनाबाई एका अभंगात म्हणतात,

होऊनिया कृष्ण कंस वधियेला
आता बुध्द झाला माझा सखा /
सकल संत गाथा अभंग क्र.३४४

वारकरी संप्रदाय व संप्रदायाचे अविभाज्य अंग म्हणजे कीर्तन व या कीर्तनासाठी अभंग रचना करणारे संत नामदेव महाराज एके ठिकाणी स्पष्टपणे म्हणतात ,

गोकुळ अवतारू सोळा सहस्त्रांवरू /
आपण योगेश्वर बौध्दरूप /
सकल संत गाथा अ.क्र १०५३

व्रतभंगासाठी बौध्द अवतार
झाला दिगंबर अवनिये
सकल संत गाथा अ.क्र.१०९६

ऐसा कष्टी होऊनिया बौध्द राहिलासी
अ.क्र.१०९८

मध्ये झाले मौन देव निजध्यानी /
बौध्द ते म्हणोनि नावेरूप /
अ.क्र . २१०५

पैठणचे शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांनीही
श्री विठ्ठल हा बुध्दच आहे यासंबंधी भाष्य केले आहे.

नववा बैसे स्थिर रुप / तया नाम बौध्दरूप/
बौध्द अवतार घेऊन / विटे समचरण ठेऊन /
पुंडलिका दिवटा पाहून / त्यांचे द्वारी गोंधळ मांडिला /
बया दार लाव / बौध्दाई बया दार लाव /
सकल संत गाथा अं.क्र.३९११

जगद्गुरु संत तुकाराम महाराज श्री विठ्ठल हा बुध्दच आहे . त्याने परिधान केलेला पिवळा पितांबर म्हणजेच बुध्दरूपी विठ्ठल च आहे.

बौध्द अवतार माझिया अदृष्टा /
मौन्य सुखे निष्ठा धारियेली /
मध्ये झाले मौने देव बीज ध्यानी /
बौध्द ते म्हणोनि नावेरूपे /

बौध्द अवतारी आम्ही झालो संत /
वर्णावया मात म्हणे नामा /
असा स्पष्टपणे त्यांनी श्रीविठ्ठलाविषयी आपली भूमिका मांडली आहे.
वारकरी संप्रदायाचा कळस जगद्गुरू संत तुकाराम झाले तर त्या कळसावर ध्वजा म्हणून संत बहिणाबाई फडकू लागल्या . एवढे महत्वाचे स्थान त्यांनी स्वतः निर्माण केले . त्या म्हणतात ,
कलियुगी बौध्द रूप धरी हरी /
तुकोबा शरीर प्रकटला /
अर्थात संत तुकोबांच्या शरीरात तथागत बुद्धांनी च प्रवेश केला आहे , असं कथन केले आहे. याचाच अर्थ संत तुकाराम हे बुध्दाच्या विचारांचे पाईक होते, असे स्पष्टीकरण संत बहिणाबाई देतात .

*श्री विठ्ठलाविषयी डॉ.बाबासाहेबांचा अन्वयार्थ, *

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा निश्चित असा अन्वयार्थ होता की, आषाडमासात पंढरपूरच्या विठ्ठलाची यात्रा भरते , आणि त्याच काळात बुध्दाच्या ' धम्मचक्र ' प्रवर्तनाची स्मृती जपण्यासाठी वर्षावास प्रारंभ करण्याची बौध्द परंपरा आहे. हा दिवस उत्सव म्हणून साजरा केला जातो. हा केवळ योगायोग नाही पंढरीचा पांडुरंग हा दुसरा तिसरा कोणी नसून, तो भगवान बुध्दच आहे आणि पंढरपूरचे मंदिर हे बुध्दविहारच आहे, असा त्यांचा निष्कर्ष आहे.

डॉ.बाबासाहेब म्हणतात , " पांडुरंग याचा पालीतला अर्थ श्वेत किंवा कमळ असा आहे. कमळ बुध्दधर्मांच प्रतीक मानलं जातं . कार्ला , भाजे , अजिंठा व वेरूळ या बौद्ध श्रध्दास्थळांतून जी शिल्पे कोरली गेली त्यात पद्मपाणी , व्रजयानी , अवलोकितेश्र्वर बोधिसत्वाच्या पांढरं कमळ देठासहित धारण केलेल्या कोरीव मूर्ती आहेत. पंढरी हा शब्द पंडुहरी शब्दाचा अपभ्रंश आहे. .. पंडू किंवा पांडू म्हणजे दु:ख ! आणि हरी म्हणजे हरण करणारा ! अर्थातच दु: खाचे हरण करणारा किंवा दु:ख निवारण करणारा ! ... या विश्वात तथागतांशिवाय दुसरा कुणी झालाय का ? " ३

मानवी जीवनातील दुःखाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तथागतांनीच प्रथम प्रयत्न केला. हाच विचार बाबासाहेब यांना महत्वाचा वाटतो . पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मंदिरातील कोरीव शिल्प आणि बुध्द लेण्यांमधील कोरीव शिल्प एकशे एक टक्के सारखेच आहे. याशिवाय धम्मपदातील गाथेच्या ओळी पंढरपूरच्या मंदिरातील गाभाऱ्यात कोरलेल्या दिसतात. मात्र पुढे प्रतिक्रांतीच्या काळानंतर भगवान बुध्दांना वैदिकांनी विष्णूच्या अवतारात टाकून दिले . त्याचा परिणाम असा झाला की, बुध्दाचे तत्वज्ञान बहुजन वर्गाच्या आचरणातून दूर सारले गेले . ....पण असे काही जरी असले तरी आमच्या बहुजन संतांनी पांडुरंगाच्या रूपात बुध्दच पाहिला . बुध्दच भजला होता , हे त्यांच्या अभंगावरून दिसून येते . ४

चंद्रभागेच्या तीरी इ.स.१२८९ कार्तिक शुद्ध एकादशी ला भागवत संप्रदाय संत नामदेव महाराज यांनी स्थापण केला . वैदिक धर्मातील उच्च निचतेला बाजूला सारून समतेच्या तत्वज्ञानावर हा संप्रदाय स्थापन झाला . डॉ.बाबासाहेब म्हणतात, " वारकरी म्हणजे ब्राह्मणी व्यवस्थेवर वार करणारा संप्रदाय होता . तो नुसत्या पंढरीच्या वार्या करणारा संप्रदाय नव्हता . संतांची सारी चळवळ ही भयमुक्तीची , भक्तीची चळवळ होती . जवळपास सर्वच संतांनी पंढरीतील विठ्ठलाच्या रुपातील बुध्द जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सुरू केले होते . त्यातून ते बुध्दवचनांचाच प्रचार - प्रसार करीत होते. .... महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अगदी कर्नाटक - आंध्रातून वारकरी येत होता . दिंडीतून टाळ - मृदुंगाच्या तालाने बेभानपणे तल्लीन होत भक्तीच्या रसात डुंबत होता . हा वारकरी पंढरीच्या पांडुरंगाकडे अत्यंत विनम्रपणे शेकडो मैल पायी जातो ...तो त्याच धम्मचक्र प्रवर्तनाची स्मृती जपण्याचा अगाध ओढीतूनच.." ३

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पक्की धारणा होती की, मानवी जीवनात दु:ख निवारणासाठी भगवान बुध्दांनी आर्य अष्टांगिक मार्गाचा स्वीकार वारकऱ्यांनी जसाच्या तसा आजवर केलेला आहे . सम्यकज्ञान,सम्यक कर्म सम्यक दृष्टी, सम्यक वाचा, सम्यक आजीविका, सम्यक स्मृती, सम्यक संकल्प ते सम्यक समाधी असा भगवान बुध्दांनी सांगितलेल्या अष्टांग मार्ग वारकरी संप्रदायाने आपला आचार धर्म म्हणून स्वीकारला आहे. इतकेच नव्हे तर वारकरी मंडळींनी विठ्ठलाला ज्या विटेवर उभा केला आहे त्या विटेला सुध्दा आठ कोन आहेत . ... वारकरी संप्रदायात अष्टगंध लावण्याची जी परंपरा आहे, ते अष्टांग मार्गाचेच प्रतीक आहे. या गंधाला दुसरेही नाव देता आले असते , पण तसे झाले नाही. ... शिवाय वारकरी संप्रदायाचे अवैदिक दैवत विठ्ठल ' कासे पितांबर ' नेसतो , हे बुध्द संघाच्या भिक्खूंचे काशाय वस्त्र आहे... आषाढ महिन्यात एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना भिक्खू संघाच्या भ्रमंतीस ' चारिका ' म्हटले जाई . भिक्खू संघात आठ - आठ , दहा - दहा हजारांहून जादा अनुयायी असत . गावागावातून जाताना प्रवचने होत . वारकरी संप्रदायाच्या ' दिंडी चे स्वरूप तसेच आहे . बुध्दाची ' चारिका 'आणि वारकऱ्यांची ' दिंडी प्रथा ' एकच आहे . ४

डॉ.बाबासाहेबांना पांडुरंगाच्या संदर्भातील सार्या गोष्टी नियोजित ग्रंथात विस्ताराने मांडायच्या होत्या. त्यासाठीच वैचारिकतेचे प्रबळ अधिष्ठान त्यांच्या जवळ होते . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सगळया ग्रंथांचे लेखन राजगृहात केलेले आहे . पण पांडुरंगावरचा ग्रंथ मात्र योगायोगाने लोणावळयातील मुक्कामातच लिहावा लागला . त्याला तसे कारणही होते . तशी त्याची पक्की धारणा ही होती . प्राचीन काळी सारा मावळ परिसर बुध्द अनुयायांनी व्यापलेला होता . भिक्खू संघाच्या शिकवणूकीने प्रभावित झालेला होता . त्यांची शिकवण पुढे दीड हजार वर्षे टिकून होती . लोणावळा - खंडाळा परिसरातून इंद्रायणीचा प्रवाह कार्ला - भाजे लेण्यांतून वाहत होता . इंद्रायणीच्या काठावर हजारो - लाखोंच्या संख्येने भिक्खू संघांनी अविरत ध्यानसाधना केली होती . परिणामी या परिसरातून लोहचुंबकीय आकर्षण निर्माण झाले होते. करूणा , प्रसन्नता विलासत होती . या करुणेच्या , प्रसंन्नतेच्या तुषारात न्हालेल्या संत ज्ञानेश्वरांनी व संत तुकारामांनी ज्ञानेश्वरी व गाथा साकारली होती. आळंदी - देहूतूनच विठ्ठल भक्तीचा उमाळा दाटला होता . इथूनच लाखो वारकरी विठू नामाचा गजर करीत आषाढी वारीला पंढरपूरला प्रस्थान करीत होते व आताही तीच परंपरा सुरू आहे . ..बुध्दाच जाणवणारं अस्तित्व आणि पंढरीच्या वारीनं आम्हालाच परका झालेला पांडुरंग, श्रीविठ्ठल आमचाच आहे, हे सिध्द करण्यासाठी हीच पवित्र भूमी असल्याची धारणा व परिसराची प्रेरणा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात होती .

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी Who is Pandurang ? या विषयाला प्रारंभ केला.त्यांच्या लिखाणाचं वैशिष्ट्य असे की, ते एकटाकी असे . सुरूवात केली की, शेवट होईस्तोवर त्यात खंड पडत नसे . पहिल्याच बैठकीत हस्तलिखिताची पानं लिहून झाली .

## सारांश

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जिज्ञासू अभ्यासक , साक्षेपी समीक्षक होते .बालपणात त्यांच्या मनावर धार्मिक संस्कार झालेले होते . वडीलांच्या सैनिकी शिस्तीचा परिणाम संपूर्ण जीवनभर त्यांनी अभ्यासाच्या अंगाने जपलेला दिसतो . बालपणातच धार्मिक ग्रंथांचे वाचन व चिंतन झाल्यामुळे त्यांच्या जिज्ञासू मनात पंढरीच्या पांडुरंगाविषयीची उत्सुकता होती . पंढरीच्या श्रीविठ्ठलाचे समाजाभिमुख असणे . महाराष्ट्रातील सर्वच संतांनी त्यांचे केलेले भरभरून वर्णन या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून त्यांनी पंढरीचा पांडुरंग नेमका कोण आहे याचा शोध घेण्यासाठी हा विस्तृत ग्रंथ लिहिण्यास घेतला . श्रीविठ्ठलाची सर्व व्यापी भूमिका , वारकरी संप्रदायाचा आचारधर्म व तत्वज्ञान या सर्व गोष्टी बुध्दधर्माला जवळच्या आहेत म्हणूनच त्यांनी पंढरीच्या पांडुरंगात त्यांना बुध्द दिसतो असा ठाम निष्कर्ष त्यांनी या लेखात अभिव्यक्त केलेला आहे. त्यांच्या या निष्कर्षावर अनेक मतभेद असू शकतात . पण त्यांनी ज्या व्यापक भूमिकेतून पंढरीच्या पांडुरंगाचा शोध घेतलेला आहे तो तेवढाच महत्वपूर्ण आहे हे मान्यच करावे लागेल.

## संदर्भ

१) पांडुरंग कोण आहे? निबंधाचा मराठी अनुवाद, डॉ.बी.आर.आंबेडकर , पृष्ठ -१

२) तिरुपती बालाजी , एक प्राचीन बौद्ध क्षेत्र ,जाॅन विल्सन , मेमोयर्स ऑन दी केव्ह टेम्पल, पृष्ठ.२३

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोणावळा : एक अनोखा ऋणानुबंध , राजा ढाले, पृष्ठ.११

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंढरीचा पांडुरंग , राजा ढाले , अस्मिता दर्श विशेषांक २०१० पृष्ठ ३१